दै. जनप्रवास.
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAY 2026

# भगवान महावीर अध्यासनास सहकार्य करू

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांची ग्वाही : रत्नत्रय मासिक प्रकाशन, पुरस्कार वितरण सोहळा

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापिठामध्ये साकारत असलेल्या भगवान महावीर अध्यासनासाठी सहकार्य करू, अशी ग्वाही पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक भट्टाचार्य महास्वामी कोल्हापूर संचलित, महाराष्ट्र जैन साहित्य परिषदेच्या वतीने शुक्रवारी पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी रत्नत्रय मासिक या विशेषांकाचे प्रकाशन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पालकमंत्री आबिटकर म्हणाले, विविध नियतकालीकांमधून युवा पिढीला संस्काराबरोबर मार्गदर्शन होणार आहे. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टरक पट्टाचार्य महास्वामी यांचे मंगल सानिध्य आणि प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री प्रकाश आबिटकर हे होते. तर लठ्ठे फौंडेशनचे अध्यक्ष अमेरिकेतील डॉ. भरत लठ्ठे उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळा डॉ. लठ्ठे यांच्या हस्ते करण्यात आला.

स्वस्तीश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र जैन साहित्य परिषद कोल्हापूर यांच्या वतीने, समाजातील विद्वान, ज्येष्ठ साहित्यिक, संपादक, सामाजिक, पत्रकार आणि साहित्य क्षेत्रातील कर्तव्य तत्पर अंशा व्यक्तींचा सत्कार दिगंबर जैन बोर्डिंगमध्ये करण्यात आला.



कोल्हापूर : रत्नत्रय मासिक या विशेषांकाचे प्रकाशन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते व स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी धनंजय मगदूम, प्रा. डी. ए. पाटील, विजयकुमार शेट्टी.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार वसंत भोसले, डॉ. महावीर अक्कोळे, धनंजय शहा, 'तरुण भारत संवाद'चे विद्याधर पिंपळे, नीलम माणगावे, विमल देवगोंडा पाटील यांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पुरस्कर्त्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी सामूहीक नमोकार महामंत्र, प्रतिमा पूजन झाले. प्राध्यापक डी. ए. पाटील यांनी स्वागत, प्रस्तावना केली. यावेळी डॉ. सावली चौगुले, सुचिता पाटील, डॉ. चेतन आवटी यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर स्वस्तिश्री लक्ष्मीसेन महाराज यांचे आशीर्वाचन झाले.

आभार श्रेणिक पाटील यांनी मानले. कार्यक्रमास संजय शेटे, सुषमा रोटे, संजय दे. पाटील, डॉ. बी. डी. खणे, विजयकुमार शेट्टी, धनंजय मगदूम, श्रावक, श्राविका उपस्थित होते.

### स्वतःला बदलायला शिका

**महाराज म्हणाले, सध्याच्या सामाजिक परिस्थितीमध्ये शांतता निर्माण करायची ताकद विद्वान साहित्यामध्येच आहे. या साहित्यामुळे नवीन पिढीचे जीवन बदलेल. पालकांनी आपल्या मुलांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. आज बाहेर काय परिस्थिती आहे, याबर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. स्वत:ला बदलायला शिका, तसेच स्वत: जबाबदारी घ्यायला शिका, पालकांचे पालन करा, असे त्यांनी सांगितले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 MAY 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती

**कोल्हापूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती विद्यापीठात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. अनिल मकर, डॉ. सुषमा मांडेकर, हेमंत जाधव, निकिता पाटील, पल्लवी वालेकर, अविनाश कांबळे, आनंदराव बेडगे, श्रीकांत देसाई, सुप्रिया पवार यांच्यीसह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

दै. जनप्रवास

03 MAY 2026
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# टाईम्स एशिया रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाची भरारी

## सार्वजनिक राज्य विद्यापीठात देशात दहावे स्थान : मूल्यांकनामध्ये प्रथमच सहभाग : सर्वांसाठी अभिमानाची बाब



**जनप्रवास : कोल्हापूर**

जागतिक स्तरावर विद्यापीठ गुणवत्तेचे मूल्यांकन करणाऱ्या टाईम्स हायर एज्युकेशन एशिया २०२६ या मानांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास उत्तुंग यश मिळाले आहे. हे मूल्यांकन विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन वातावरण व गुणवत्ता, आंतरराष्ट्रीयकरण, उद्योग-शिक्षण, सहकार्य या पंचसूत्रीवर आधारित असते. भारतातील एकूण सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत दहावे आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक राज्य विद्यापीठात दुसरे मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामध्ये महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ या सार्वजनिक राज्य विद्यापीठांचा समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठाने या मूल्यांकनामध्ये प्रथमच सहभाग नोंदवून या प्रतिष्ठित मूल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठाला ३६ देशांतर्गत आशिया स्तरावर ४०१–५०० या मानांकन बँडमध्ये स्थान प्राप्त झाले आहे. या एशिया स्तरावरील पहिल्या ५०० मानांकनप्राप्त विद्यापीठांमध्ये भारतातील जवळपास ६६ भारतीय संस्था असून यामध्ये १९ भारतीय सर्वोच्च संशोधन संस्था, ९ केंद्रीय विद्यापीठे, १० सार्वजनिक राज्य विद्यापीठे व २८ खाजगी / स्वायत्त विद्यापीठांचा समावेश आहे. या मूल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास भारतीय स्तरावर एकूण विद्यापीठांतर्गत १३ वी मानांकन बँड आणि सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत ५ वी मानांकन बँड प्राप्त झाली आहे.

पहिल्याच प्रयत्नात मिळालेले हे मानांकन विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कामगिरीची साक्ष देणारी असून यामुळे विद्यापीठाची जागतिक स्तरावरील ओळख अधिक दृढ झाली आहे.

भारतातील इतर सार्वजनिक राज्य विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठ हे गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि समाजाभिमुख कार्य या सर्व बाबींमध्ये आघाडीवर असल्याचे स्पष्ट झाले आहे. ही कामगिरी विद्यापीठाच्या सर्व घटकांसाठी शिक्षक, अधिकारी-कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी, सर्व निगडित घटक यांच्यासाठी अभिमानाची बाब आहे. भविष्यात विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरती आणखी उच्च स्थान मिळवण्यासाठी हीच प्रेरणा ठरणार आहे.

▶ पान ४ वर

## टाईम्स एशिया रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाची भरारी

▶ पान १ वरून : हे अभिमानास्पद व ऐतिहासिक यश विद्यापीठाचे प्रा. सुरेश गोसावी, प्रा.ज्योती जाधव, डॉ. विलास शिंदे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संविधानिक अधिकाऱ्यांचे पाठबळ, शिक्षकांचे सातत्यपूर्ण संशोधन व अध्यापन, विद्यार्थ्यांची एकूण गुणवत्ता, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सहभाग आणि इतर सर्व संबंधित घटकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे. हे यश विद्यापीठासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्य व देशासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAY 2026
सकाळ

# टाईम्स एशिया रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाची भरारी

## प्रथम सहभागातच राज्य विद्यापीठांत देशात दहावे स्थान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर विद्यापीठ गुणवत्तेचे मूल्यांकन करणाऱ्या टाईम्स हायर एज्युकेशन एशिया २०२६ या मानांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास उत्तुंग यश मिळाले आहे. हे मूल्यांकन विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन वातावरण व गुणवत्ता, आंतरराष्ट्रीयीकरण, उद्योग, शिक्षण, सहकार्य या पंचसूत्रीवर आधारित असते. भारतातील एकूण सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत दहावे आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक राज्य विद्यापीठांत दुसरे मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामध्ये महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ या सार्वजनिक राज्य विद्यापीठांचाच समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठाने या मूल्यांकनामध्ये प्रथमच सहभाग नोंदवून या प्रतिष्ठित मूल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठाला ३६ देशांतर्गत आशिया स्तरावर ४०१-५०० या मानांकन बँडमध्ये स्थान प्राप्त झाले आहे. या एशिया स्तरावरील पहिल्या ५०० मानांकनप्राप्त विद्यापीठांमध्ये भारतातील जवळपास ६६ भारतीय संस्था असून, यामध्ये १९ भारतीय सर्वोच्च संशोधन संस्था, ९ केंद्रीय विद्यापीठे, १० सार्वजनिक राज्य विद्यापीठे व २८ खासगी-स्वायत्त विद्यापीठांचा समावेश आहे. या मूल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास भारतीय स्तरावर एकूण विद्यापीठांतर्गत १३ वी मानांकन बँड आणि सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत ५ वी मानांकन बँड प्राप्त झाले आहे.



पहिल्याच प्रयत्नात मिळालेले हे मानांकन विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कामगिरीची साक्ष देणारी असून, यामुळे विद्यापीठाची जागतिक स्तरावरील ओळख अधिक दृढ झाली आहे. हे अभिमानास्पद व ऐतिहासिक यश विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संविधानिक अधिकाऱ्यांचे पाठबळ, शिक्षकांचे सातत्यपूर्ण संशोधन व अध्यापन, विद्यार्थ्यांची एकूण गुणवत्ता, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहभाग आणि इतर सर्व संबंधित घटकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे. हे यश विद्यापीठासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्य व देशासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

यासंदर्भात कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी विद्यापीठातील सर्व घटकांचे अभिनंदन केले. भारतातील इतर सार्वजनिक राज्य विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठ हे गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि समाजाभिमुख कार्य या सर्व बाबींमध्ये आघाडीवर असल्याचे या मानांकनामधून स्पष्ट झाले आहे. ही कामगिरी विद्यापीठाच्या सर्व घटकांसाठी शिक्षक, अधिकारी-कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी, विद्यापीठ क्षेत्राशी सर्व निगडित घटक यांच्यासाठी अभिमानाची बाब आहे. भविष्यात विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी उच्च स्थान मिळवण्यासाठी हीच प्रेरणा ठरणार आहे, असे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.

3 MAY 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# टाईम्स एशिया रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाची भरारी

- देशात दहावे स्थान

प्रतिनिधी, कोल्हापूर



जागतिकस्तरावर विद्यापीठ गुणवत्तेचे मुल्यांकन करणाऱ्या 'टाईम्स हायर एज्युकेशन एशिया २०२६' या मानांकनामध्ये शिवाजी विद्यापीठाने भरारी घेतली आहे. विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन वातावरण आणि गुणवत्ता, आंतरराष्ट्रीयकरण, उद्योग–शिक्षण, सहकार्य या पंचसुत्रीवर आधारित मुल्यांकनात विद्यापीठाने यश मिळवत देशात दहावे स्थान पटकावले आहे.

भारतातील एकूण सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत दहावे आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक राज्य विद्यापीठांत दुसरे मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामध्ये महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ या सार्वजनिक राज्य विद्यापीठांचाच समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठाने या मुल्यांकनामध्ये प्रथमच सहभाग नोंदवून या प्रतिष्ठित मूल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठाला ३६ देशांतर्गत आशिया स्तरावर ४०१–५०० या मानांकन बँडमध्ये स्थान प्राप्त झाले आहे. या एशिया स्तरावरील पहिल्या ५०० मानांकनप्राप्त विद्यापिठांमध्ये भारतातील जवळपास ६६ भारतीय संस्था असून यामध्ये १९ भारतीय सर्वोच्च संशोधन संस्था, ०९ केंद्रीय विद्यापीठे, १० सार्वजनिक राज्य विद्यापीठे आणि २८ खासगी/स्वायत्त विद्यापीठांचा समावेश आहे. या मुल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास भारतीय स्तरावर एकूण विद्यापीठांअंतर्गत १३ वी मानांकन बँड आणि सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत पाचवी मानांकन बँड प्राप्त झाली आहे.

पहिल्याच प्रयत्नात मिळालेले हे मानांकन विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कामगिरीची साक्ष देणारी असून यामुळे विद्यापीठाची जागतिक स्तरावरील ओळख अधिक दृढ झाली असल्याचे प्रभारी कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी सांगितले. प्रभारी प्र–कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संविधानिक अधिकाऱ्यांचे पाठबळ, शिक्षकांचे सातत्यपूर्ण संशोधन, अध्यापन, विद्यार्थ्यांची एकूण गुणवत्ता, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सहभाग सर्वांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे. हे यश विद्यापीठासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्य आणि देशासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

## अभिमानाची बाब...

**भारतातील इतर सार्वजनिक राज्य विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठ हे गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि समाजाभिमुख कार्य या सर्व बाबींमध्ये आघाडीवर असल्याचे या मानांकनामधून स्पष्ट झाले आहे. ही कामगिरी विद्यापीठाच्या सर्व घटकांसाठी शिक्षक, अधिकारी–कर्मचारी, आजी–माजी विद्यार्थी, विद्यापीठ क्षेत्राशी सर्व निगडीत घटक यांच्यासाठी अभिमानाची बाब आहे. भविष्यात विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी उच्च स्थान मिळवण्यासाठी हीच प्रेरणा ठरणार आहे, असेही कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी सांगितले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

03 MAY 2026

# राज्य विद्यापीठांत दहावे स्थान; शिवाजी विद्यापीठाने वाढवला कोल्हापूरचा मान!

## टाईम्स एशिया रँकिंगमध्ये उल्लेखनीय कामगिरी; शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठने जागतिक दर्जाच्या टाईम्स हायर एज्युकेशन एशिया रँकिंग २०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी नोंदवत आपली शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित केली आहे.

प्रथमच सहभाग घेतलेल्या या मानांकनात विद्यापीठाने आशिया स्तरावर ४०१ बाय ५०० या बँडमध्ये स्थान मिळवले असून, भारतातील सार्वजनिक राज्य विद्यापीठांमध्ये दहावे स्थान पटकावले आहे. महाराष्ट्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठनंतर दुसरे स्थान मिळवून विद्यापीठाने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.




शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन वातावरण, आंतरराष्ट्रीयीकरण, उद्योग-सहकार्य आणि अध्यापन या पंचसूत्री निकषांवर आधारित या मानांकनात भारतातील सुमारे ६६ संस्थांचा समावेश आहे. त्यामध्ये १९ संशोधन संस्था, ९ केंद्रीय विद्यापीठे, १० सार्वजनिक राज्य विद्यापीठे आणि २८ खासगी/स्वायत्त विद्यापीठांचा समावेश आहे. एकूण भारतीय विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठ १३ व्या बँडमध्ये, तर सार्वजनिक राज्य विद्यापीठांमध्ये ५ व्या बँडमध्ये स्थानावर आहे.

कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांचे संशोधन, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि प्रशासनाचा समन्वय यामुळे हे यश शक्य झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या यशामुळे विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख अधिक दृढ झाली असून, भविष्यात उच्च स्थान मिळवण्याची प्रेरणा मिळाली आहे. राज्य आणि देशासाठीही ही अभिमानास्पद कामगिरी ठरली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दै. जनप्रवास.
03 MAY 2026

# शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात



शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस साजरा केला. शुक्रवारी सकाळी ८ वाजता प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख,आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी, आयक्यूएसी संचालक डॉ. सागर डेळेकर, बॅ. बाळासाहेब खर्डेकर, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे,आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. सावलीराम घाणे आणि राष्ट्रीय सेवा योजना प्रभारी संचालक डॉ. कबीर खराडे यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.